| आपली सेवा आमचे कर्तव्य — महाराष्ट्र राज्य लोक सेवा हक्क आयोग | राज्य लोकसेवा हक्क आयोग, पुणे विभाग, पुणे. कार्यालयाचा पत्ता : ३ रा मजला, छत्रपती शिवाजीनगर- घोले रोड क्षेत्रिय कार्यालय, पुणे म.न.पा.शिवाजीनगर पुणे -४११ ००४ | |
|---|---|---|
| दू.क्र.(०२०)-२९९५०६६३ | ई-मेल- crtspune@maharashtra.gov.in | |

क्र. आस्था २०२४/रासेहआपु/प्र.क्र.३७२ /कार्या-१/ ७४४

दि. ०४.१२.२०२४

प्रति,

संचालक,
माहिती व तंत्रज्ञान विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

विषय :- शासनाच्या संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करणेबाबत...

संदर्भ :- पत्र क्र. आस्था २०२४/रासेहआपु/प्र.क्र.३७२ /कार्या-१/७१७, दि.२७.११.२०२४

महोदय,

उपरोक्त संदर्भाधीन पत्रान्वये कळविल्यानुसार, राज्य सेवा हक्क आयोग, पुणे महसुली विभाग, पुणे या कार्यालयातील विवक्षित कामासाठी शासकीय सेवेतून गट ब (अराजपत्रित) संवर्गातून सेवानिवृत्त झालेले लघुलेखक यांची सामान्य प्रशासन विभागाच्या दि.१७.१२.२०१६ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार करारपध्दतीने विवक्षित कामासाठी नियुक्ती करण्याबाबत अर्ज मागविण्याकरीता जाहिरात दि.२७.११.२०२४ रोजी शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

सदर जाहिरातीनुसार इच्छुक सेवानिवृत्त अधिकाऱ्यांना अर्ज सादर करण्यास दि.१३.१२.२०२४ रोजी सायंकाळी ६.१५ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. तसेच अर्ज सादर केलेल्या उमेदवारांनी मुलाखतीसाठी दिनांक १७.१२.२०२४ रोजी दुपारी ३.०० वाजता जाहिरातीमध्ये नमूद आयोगाच्या पत्त्यावर स्वखर्चाने उपस्थित रहावयाचे आहे.

तरी संदर्भाधीन पत्रान्वये प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरातीमधील अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत आणि मुलाखतीचा दिनांक या बदलासंदर्भातील सोबत जोडलेले पत्रक शासनाच्या संकेतस्थळावर तातडीने प्रसिध्द करण्यात यावे, ही विनंती.

आपली,

(अनुराधा खानविलकर)
उप सचिव
राज्य सेवा हक्क आयोग,
पुणे महसुली विभाग पुणे

सहपत्र :- वरीलप्रमाणे.

| आपली सेवा आमचे कर्तव्य – महाराष्ट्र राज्य लोक सेवा हक्क आयोग | राज्य लोकसेवा हक्क आयोग, पुणे विभाग, पुणे. कार्यालयाचा पत्ता : ३ रा मजला, छत्रपती शिवाजीनगर- घोले रोड क्षेत्रिय कार्यालय, पुणे म.न.पा.शिवाजीनगर पुणे -४११ ००४ |
|---|---|
| दू.क्र.(०२०)-२९९५०६६३ | ई-मेल- crtspune@maharashtra.gov.in |

क्र. आस्था २०२४/रासेहआपु/प्र.क्र.३७२ /कार्या-१/७४४

दि. ०४.१२.२०२४

# जाहिरात मुदतवाढ

**राज्य सेवा हक्क आयोग, पुणे महसुली विभाग, पुणे या कार्यालयातील विवक्षित कामासाठी शासकीय सेवेतून गट ब (अराजपत्रित) संवर्गातून सेवानिवृत्त झालेले लघुलेखक यांच्या सेवा करार तत्वावर घेण्यासाठी अर्ज करण्यास मुदतवाढ**

राज्य सेवा हक्क आयोग, पुणे महसुली विभाग, पुणे या कार्यालयातील विवक्षित कामासाठी शासकीय सेवेतून गट ब (अराजपत्रित) संवर्गातून सेवानिवृत्त झालेले लघुलेखक यांची सामान्य प्रशासन विभागाच्या दि.१७.१२.२०१६ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार करारपध्दतीने विवक्षित कामासाठी नियुक्ती करण्याबाबत अर्ज मागविण्याकरीता जाहिरात दि.२७.११.२०२४ रोजी शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

- सदर जाहिरातीस अनुलक्षुन इच्छुक सेवानिवृत्त अधिकाऱ्यांना अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत दि.०५.१२.२०२४ अशी देण्यात आली होती. आता अर्ज सादर करण्यासाठी दि.१३.१२.२०२४ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. इच्छुक सेवानिवृत्त अधिकाऱ्यांनी त्यांचे विहित नमुन्यातील अर्ज **दि.१३.१२.२०२४ रोजी सायंकाळी ६.१५ पर्यंत** जाहिरातीमध्ये नमूद आयोगाच्या पत्त्यावर समक्ष अथवा टपालाद्वारे पोहोचतील असे सादर करावेत.
- दि.२७.११.२०२४ रोजीच्या जाहिरातीस अनुसरुन अर्ज सादर केलेल्या उमेदवारांनी मुलाखतीसाठी **दिनांक १७.१२.२०२४ रोजी दुपारी ३.०० वाजता** जाहिरातीमध्ये नमूद आयोगाच्या पत्त्यावर स्वखर्चाने उपस्थित रहावयाचे आहे.

(अनुराधा खानविलकर)
उप सचिव
राज्य सेवा हक्क आयोग,
पुणे महसुली विभाग पुणे